प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना नियमित वैद्यकीय चाचण्यांची (Health Check-up Plan) सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१
आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०१९/१४०४/प्र.१२
दिनांक : 13 JUN 2019

संदर्भ : १. प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०१७/२८९१/प्र.१२ दि.०५/०७/२०१७.
२. प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०१७/३२८५/प्र.१२ दि.३१/०७/२०१७.

**आ दे श**

१/- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सेवेतील, ४० वर्षे वयावरील अधिकारी/कर्मचारी यांनी दोन वर्षातून एकदा वैद्यकीय तपासण्या करुन विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

२/- मुंबईस्थित कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी अपोलो क्लिनिक ,कुलाबा व अंधेरी, मुंबई हे रुग्णालय वैद्यकीय तपासणीसाठी अधिकृत करण्यात येत आहे. सदर चाचणीसाठी रु.३६००/- (रुपये तीन हजार सहाशे मात्र) इतकी रक्कम वैद्यकीय खर्च म्हणून मर्यादित करण्यात आली आहे. अधिकारी/कर्मचारी यांनी सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी व केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती ते कार्यरत असलेल्या प्राधिकरण/मंडळ कार्यालयाकडून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वर्ग- ४ चे कर्मचाऱ्यांनी केलेल्या वैद्यकीय तपासणी शुल्काची प्रतिपुर्ती अपोलो क्लिनिककडून देयक प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून करण्यात यावी.

३/- मुंबईस्थित कार्यालये वगळता इतर प्रादेशिक कार्यालयातील ४० वर्षाच्यावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.भाप्रसे-२०१८/प्र.क्र.२५०/२०१८/९, दि. १५/१२/२०१८ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद रूग्णालये/संस्थांमधून दोन वर्षातून एकदा वैद्यकीय तपासण्या करुन विहीत नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. याकरिता संबंधित मुख्य अधिकारी यांनी संबंधित रुग्णालयांकडून वैद्यकीय तपासणीची सुविधा प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची संमती घेऊन रुग्णालय निश्चित करुन, संबधीत रुग्णालयाकडून रु.३६००/- चे मर्यादेत दर निश्चित करुन घेणे आवश्यक राहील.

४/- शासन निर्णय दि.१५/१२/२०१८ मधील इतर अनुषंगिक अ. क्र. ४,५,६,८,९ मधील तरतूदी प्राधिकरणातील अधिकारी /कर्मचारी यांना त्या त्या अनुषंगाने लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५/- सन २०१९-२० या वर्षासाठी माहे जुलै-ऑगस्ट २०१७ पर्यत प्राधिकरणातील ४० वर्षावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासण्या करुन विहित नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

बाहिरील मंडळांना पाठवा

६/- सदर वैद्यकीय तपासणी चाचणी फक्त कार्यरत अधिकारी/कर्मचा-यांकरिताच अनुज्ञेय आहे. त्यांच्यावर अवलंबित कुटुंबियांकरीता सदर सुविधा अनुज्ञेय नाही.

७/- सदर तपासणीची नोंद सेवापुस्तकात करणे बंधनकारक आहे. प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवापुस्तकात नोंद घेतल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

सदरचे आदेश म्हाडा संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in वर उपलब्ध राहील.

***मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण***
***यांचे मान्यतेने,***

**(प्रसाद उकर्डे)**
**सचिव/प्राधिकरण**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मं.
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा
८) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं.,कोंकण,पुणे,नाशिक,औरंगाबाद, अमरावती, नागपूर,मंडळ
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मंडळ
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१४) संचालक, पी.डी.सी. पुणे
१५) व्यवस्थापकीय संचालक/शि.पु.प्रा.
१६) सचिव/झो.पु.प्रा.

प्रत, मुख्य माहित्ती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. यांना वेबसाईटवर अपलोड करणेसाठी.

प्रत: प्रशासकीय अधिकारी,प्राधिकरण/मुंबई मंडळ/ मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./कोंकण / पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती मंडळ

प्रत :- कार्यासन अधिकारी/वित्त/प्रा.

<u>प्रत माहितीसाठी :-</u>

मा.अध्यक्ष/प्रा. यांचे खाजगी सहायक.
मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहायक.
मा.सभापती//मुंबई मंडळ/ मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./कोंकण / पुणे / नागपूर यांचे स्वीय सहायक.
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

**प्रत:** प्रशासन - ११/१४/ प्रा.